महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान कार्यक्रमांतर्गत इगतपुरी व जव्हार नगरपरिषदेच्या पाणी पुरवठा प्रकल्पासाठी आदिवासी घटक कार्यक्रमांतर्गत निधी वितरीत करण्याबाबत.

लेखाशिर्ष (२२१७ अे०६५)

महाराष्ट्र शासन
आदिवासी विकास विभाग
शासन निर्णय क्रमांकः बीयुडी-२०१८/ प्र.क्र.०७ /कार्यासन-६
मंत्रालय विस्तार, मुंबई-४०० ०३२
तारीख: - ५ मार्च, २०१९.

वाचा -

१) शासन परिपत्रक,वित्त विभाग क्र.अर्थसं-२०१८ /प्र.क्र.६९ / अर्थ-३, दि. ०२.०४.२०१८ व दि.२५.०१.२०१९

२) नगर विकास विभाग नस्ती क्र. नगरो- २०१९ / प्र.क्र. ५२ / नवि- ३३.

शासन निर्णय-

आदिवासी घटक कार्यक्रमांतर्गत मागणी क्र. टी-५, २२१७, नगर विकास, ८०- सर्वसाधारण, ७९६- जनजाती क्षेत्र उपयोजना, (०१) (०५) महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान अंतर्गत नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेतील नागरी क्षेत्रातील आदिवासींना वित्तीय सहाय्य (२२१७ ए ०६५) या लेखाशिर्षाखाली सन २०१८- १९ आर्थिक वर्षामध्ये रु. ११००.०० लाख इतका निधी अर्थसंकल्पित करण्यात आलेला आहे.

त्यानुषंगाने नगर विकास विभागाने वाचा क्र. २ येथील नस्तीवर प्रस्तावित केल्यानुसार महाराष्ट्र सुवर्णजयंती नगरोत्थान महाभियानांतर्गत सन २०१८-१९ या आर्थिक वर्षाच्या तरतूदीतून (०१) (०५) महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान अंतर्गत नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेतील नागरी क्षेत्रातील आदिवासींना वित्तीय सहाय्य (२२१७ ए ०६५) या लेखाशिर्षाखाली इगतपुरी व जव्हार नगरपरिषदेच्या पाणी पुरवठा प्रकल्पासाठी अनुक्रमे रु. ३२३.८० लाख व रु.१६७.०० लाख असा एकूण रु.४९०.८० लाख (**रुपये चार कोटी नव्वद लाख ऐंशी हजार फक्त)** इतका प्रशासकीय विभाग प्रमुख म्हणून प्रधान सचिव, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई यांना अर्थसंकल्पीय निधी वितरण प्रणालीवर (BEAMS) वितरीत करण्यास मंजूरी प्रदान करण्यात येत आहे.

२. सदर निधी अर्थसंकल्पीय वितरण प्रणालीवर वितरीत करण्यात आला आहे. नियंत्रण अधिकारी / विभागप्रमुख यांनी खर्चासंबंधीच्या सध्याच्या शासकीय धोरणास अनुसरुन मंजूर आराखडयानुसार सदर निधी याच वर्षात खर्च होईल याची दक्षता घ्यावी.तसेच उपलब्ध करुन दिलेल्या तरतूदीतून झालेल्या खर्चाचा अहवाल, लेखाशिर्षनिहाय / उपलेखाशिर्षनिहाय तसेच साध्य झालेले भौतिक उद्दिष्टनिहाय माहिती, निधी उपयोगिता प्रमाणपत्र, संबंधित क्षेत्रिय अधिकारी यांनी आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक; संबंधित अपर आयुक्त, आदिवासी विकास; आदिवासी विकास विभाग व नगर विकास विभाग यांना प्रत्येक महिन्याच्या १० तारखेपर्यंत पाठवणेबाबत सूचना देण्यात यावी.

३. नियंत्रण अधिकारी व विभाग प्रमुख यांनी आदिवासी उपयोजना क्षेत्रात, अतिरिक्त आदिवासी उपयोजना क्षेत्रात तसेच आदिवासी उपयोजना क्षेत्राबाहेरील क्षेत्रात विविध योजनांवर केलेला खर्च स्वतंत्रपणे नोंदविला जाईल याची दक्षता घ्यावी. जेणेकरुन शासनाला आदिवासी उपयोजना क्षेत्रातील व उपयोजना क्षेत्राबाहेरील योजनांवर होणा-या खर्चावर लक्ष ठेवता येईल.

४. आदिवासी घटक कार्यक्रमांतर्गत उपलब्ध करुन दिलेल्या तरतुदीतुन आदिवासी उपयोजना क्षेत्रात पायाभूत सविधा निर्माण करण्याबाबतच्या तसेच वैयक्तिक लाभाच्या योजना घेण्यात याव्यात आणि आदिवासी उपयोजना क्षेत्राबाहेरील क्षेत्रात फक्त वैयक्तिक लाभाच्या योजना घेण्यात याव्यात.

५. सदर शासन निर्णय वित्त विभागाने **वाचा** येथील क्रमांक १ अन्वये विभागास प्रदान केलेल्या अधिकारान्वये निर्गमित करण्यात येत आहे.

६. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०३०११९१३२९११२४ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Ravindra Digambarrao Aute

Digitally signed by Ravindra Digambarrao Aute
DN: cn=Ravindra Digambarrao Aute, o=Tribal Development Department, ou=Government of Maharashtra, email=rajendra.aute@nic.in, c=IN
Date: 2019.03.05 15:01:04 +05'30'

रविंद्र दि.औटे
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. प्रधान सचिव (नगर विकास -२), नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
२. आयुक्त, आदिवासी विकास, महाराष्ट्र राज्य, नाशिक.
३. अपर आयुक्त, आदिवासी विकास विभाग, नाशिक.
४. प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, नाशिक / नंदूरबार / तळोदा.
५. ग्रंथपाल, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, ५ वा माळा, विधानभवन, मुंबई.
६. महालेखापाल (लेखापरिक्षा) / (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र १/२, मुंबई / नागपूर.
७. अधिदान व लेखाधिकारी,मुंबई.
८. निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई.
९. वित्त विभाग / नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
१०. कार्यासन अधिकारी, कार्यासन- १७ / कार्यासन-२, आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई
११. निवड नस्ती (का.६), आदिवासी विकास विभाग